निविदा क्र. 01/2026

निविदा सुचना

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

(जिल्हा न्यायालय, जालना ई–मेल mahjaldc@mhstate. nic.in)
फोन कमांक 02482–225053

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना आस्थापनेवर निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे ०१ माळी या चतुर्थ श्रेणी पदाची सेवा दोन वर्ष कालावधी करीता शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदारा मार्फत कंत्राटी सेवेने (आउटसोर्सिंग) विहित नमुन्यामध्ये निविदा/दरपत्रक offline पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

जिल्हा न्यायालयाच्या प्रशासकीय कार्यालयाच्या अटी व शर्ती, विस्तृत निविदा, प्रपत्र इ. जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळ http://jalna.dcourts.gov.in आणि जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांचे सुचना फलकावर दिनांक २१/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजेपासुन ते दिनांक ३१/०७/२०२६ रोजी सायंकाळी ०५–०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

निविदा रकमेचा भरणा व अनामत रक्कमेचा भरणा फक्त Offline D. D. द्वारेच करणे आवश्यक आहे.

दिनांक :– २०/०७/२०२६

(एन. एस. शेख)
जिल्हा न्यायाधीश–२, जालना

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

(जिल्हा न्यायालय, जालना ई–मेल mahjaldc@mhstate. nic.in)
फोन कमांक 02482–225053

निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे दोन वर्षांकरिता बाहययंत्रणेद्वारे शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने माळी (बागकामगार) — १ हे पद पुरविणेबाबत दोन लिफाफा, तांत्रीक लिफाफा (Technical Bid Envelop) व आर्थिक लिफाफा (Financial Bid Envelop) निविदा/दरपत्रक Offline पध्दतीने निविदाकारांकडुन विहीत नमुन्यात सिलबंद स्वरुपात मागविण्यात येत आहे.

निविदा क्र.	कामाचे ठिकाण	कामाचे स्वरुप	शासन निर्णयाप्रमाणे पद संख्या	कामाची वार्षीक अंदाजीत रक्कम रुपये
१/२६	जिल्हा व सत्र न्यायालय, जालना	जिल्हा व सत्र न्यायालय, जालना परीसरातील अस्तीत्वात असलेल्या झाडांची देखभाल करणे/ निगा राखणे, तसेच नव्याने आवश्यक ती झाडे / फुलझाडे लावुन न्यायालयीन परीसर/ बगीचा सुशोभीत करणे. न्यायीक अधिकारी / कर्मचारी बागे संबंधीत जी कामे सांगतील ती कामे व इतर कामे करणे इत्यादी.	पदसंख्या माळी —१ (बागकामगार)	५,४९,७९२/—
			एकुण	५,४९,७९२/—

निविदेचे वेळापत्रक / तपशिल

अ.क्र.	निविदा रूपरेषा	दिनांक व वेळ
१	ऑफलाईन निविदा प्रसिध्द करणे	दिनांक २१/०७/२०२६ वेळ ११.०० वाजता
२	ऑफलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक	दिनांक ३१/०७/२०२६ वेळ ०५.०० वाजता
३	निविदाकारांची निविदा भरण्यापुर्वी निविदा समिती सोबत चर्चा / बैठक	दिनांक २४/०७/२०२६ वेळ ०२.३० वाजता जिल्हा व सत्र न्यायालय, जालना
४	तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक (शक्य असल्यास)	दिनांक ०१/०८/२०२६ वेळ ०५.३० वाजता
५	ऑफलाईन निविदा पाठविण्याचा पत्ता	मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, सर्वे नं. ४८८, जिल्हाधिकारी कार्यालया शेजारी, जालना ४३१२०३.
६	कार्यालयीन दुरध्वनी कमांक	०२४८२—२२५०५३

अ.क्र.	कार्यालयाचे नांव	कंत्राटदाराने भरावयाची अनामत (E.M.D.) रक्कम	कामाचा कालावधी	निविदा फि
१	जिल्हा व सत्र न्यायालय, जालना	रूपये २५,०००/—	दोन वर्षे	रूपये १,०००/—

पदाचे नाव	**माळी (बागकामगार)**
संख्या	१

टिप :—

१. उपरोक्त निविदा सुचनेतील अधिक माहितीकरिता इच्छुक निविदाकारांनी संकेतस्थळ http://jalna.dcourts.gov.in पहावे.

२. निविदा शुल्क रूपये १,०००/— प्रति निविदा (ना—परतावा) व अनामत / बयाना रक्कम रूपये २५,०००/— ही ऑफलाईन पध्दतीने दोन वेगवेगळया डी.डी. स्वरुपात मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना यांच्या नावाने वित्त विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे जमा करावी. सदरचे दोनही मुळ डी.डी. या कार्यालयास जिल्हा व सत्र न्यायालय, सर्वे नं. ४८८, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, जालना या पत्त्यावर दिनांक ३१/०७/२०२६ सायंकाळी ०५—०० वाजेपर्यंत सादर करावे. कोणत्याही कारणास्तव नमुद दिनांकास सदरचे दोनही मुळ डी.डी. या कार्यालयास प्राप्त न झाल्यास त्या निविदा धारकाची निविदा ग्राहय धरली जाणार नाही / रद्द ठरविण्यात येईल.

३. ऑफलाईन निविदेचे वेळापत्रक, अटी व शर्ती संबंधीत अधिक माहिती http://jalna.dcourts.gov.in या संकेतस्थळावर आणि जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांचे सुचना फलकावर उपलब्ध आहे.

४. ऑफलाईन निविदा सुचना http://jalna.dcourts.gov.in या संकेतस्थळावर आणि जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांचे सुचना फलकावर उपलब्ध आहे. दिनांक २१/०७/२०२६ रोजी ११—०० वाजेपासुन ते दिनांक ३१/०७/२०२६ सायंकाळी ०५—०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

५. दोन्ही लिफाफे सादर करतांना निविदाकाराने लिफाफ्यावर स्पष्ट व ठळक अक्षरात तांत्रिक निविदा लिफाफा व आर्थिक निविदा लिफाफा असे नमुद करणे आवश्यक आहे

६. कंत्राटदारांना ऑफलाईन निविदेबाबत काही अडचणी असल्यास त्यांनी Helpdesk Nos. : ०२४८२—२२५०५३, e-mail : dcjal@nic.in वर संपर्क साधावा.

७. निविदाकारांनी निविदेसोबत सादर केलेले सर्व कागदपत्रांच्या छायाकींत प्रत कागदपत्रांच्या पडताळणीसाठी **दोन प्रतीत दि. ३१/०७/२०२६ रोजी** जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

८. कंत्राट मिळालेल्या कंत्राटदाराकडील कर्मचा—यांना बागकामाचे संपुर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे.

९. सदर कामाची एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

(एन. एस. शेख)
जिल्हा न्यायाधीश—२, जालना

परिशिष्ट "०१"

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना न्यायालयातील माळी (बाग कामगार) ०१ पदाचे दोन वर्ष कालावधीकरीता शासनमान्य नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन कंत्राटी सेवेने निविदेचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	पदाचे नाव	कामाचे स्वरूप	पद संख्या	निविदा रक्कम (दोन वर्षाकरीता)
१	माळी (बाग कामगार)	जिल्हा व सत्र न्यायालय, जालना परीसरातील अस्तीत्वात असलेल्या झाडांची देखभाल करणे/ निगा राखणे, तसेच नव्याने आवश्यक ती झाडे / फुलझाडे लावुन न्यायालयीन परीसर/ बगीचा सुशोभीत करणे. न्यायीक अधिकारी / कर्मचारी बागे संबंधीत जी कामे सांगतील ती सर्व कामे व इतर कामे करणे इत्यादी.	०१	३,९८,४००/—
२		बागकामाकरीता साहित्याचा अंदाजीत खर्च १५%		५९,७६०/—
३		अनुक्रमांक १ + २		४,५८,१६०/—
४		विमा २% (अ. क्र. ३ वर)		९१६३.२०
५		वस्तु व सेवा कर १८% (अ. क्र. ३ वर)		८२,४६८.८०
६		दोन वर्षाकरीता एकुण रक्कम (अ.क्र. ३ +४+५)		५,४९,७९२/—

दिनांक :— २०/०७/२०२६

(एन. एस. शेख)
जिल्हा न्यायाधीश—२, जालना

निविदा भरणा—या एजन्सीने तांत्रिक लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाची कागदपत्रे

अ.क्र.	निविदाधारकाने सोबत जोडावयाची कागदपत्रे	सोबत जोडली आहे होय / नाही
	ई—निविदा कंत्राटदाराचे / संस्थेचे / कंपनीचे नाव	
१	कंपनी / संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची छायाकींत प्रत	
२	कंपनी / संस्थेचे पॅन कार्डची छायाकींत प्रत	
३	कंपनी / संस्थेचे सेवाकराच्या / जीएसटी प्रमाणपत्राची प्रत	
४	कंपनी / संस्थेचे प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्राची छायाकींत प्रत	
५	कंपनी / संस्थेचे पी. एफ. प्रमाणपत्राची छायाकींत प्रत.	
६	कंपनी / संस्थेचे ई.एस.आय.सी. प्रमाणपत्राची छायाकींत प्रत	
७	कंपनी / संस्थेचे व्हॅलीड लेबर लायसन्स प्रमाणपत्र छायाकींत प्रत (कामगार आयुक्त कार्यालयाने दिलेले)	
८	कंपनी / संस्थेचे मागील तीन आर्थिक वर्षाच्या आयकर प्रमाणपत्राची छायाकींत प्रत मागील तीन वर्षाचे रिटर्न्स व ऑडिट रिपोर्ट निविदा धारकाची सन २०२२—२३, २०२३—२०२४ व २०२४—२०२५ या प्रत्येक वर्षाची उलाढाल रक्कम रूपये ५,००,०००/— (अक्षरी रुपये पाच लक्ष मात्र) किंवा त्यापेक्षा जास्त असल्याबाबतचे चार्टर्ड अकाउंटंट यांचेकडुन प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करावे.	
९	ई—निविदाकाराकडे सदर कामाचा मागील दोन वर्षाचा शासकीय लेबर सप्लायर सेवा पुरविण्याचे सिमीलर कामाचे अनुभव प्रमाणपत्र व सद्य स्थितीत शासकीय संस्थेत स्वच्छता सेवा / लेबर सप्लायर सेवा चालु असल्याची कार्यादेशाची प्रत जोडावी.	
१०	सहकारी संस्था असल्या निविदा भरणेबाबत मा. सहा. निबंधक सह संस्था यांचे चालु महिन्यातील अनुमती पत्र सादर करावे	
११	रूपये ०५,००,०००/— (अक्षरी रुपये पाच लक्ष मात्र) राष्ट्रीयकृत बॅकेचे सॉल्वन्सी प्रमाणपत्र प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना या नावाने निविदाधारकाने सादर करणे आवश्यक आहे.	
१२	गुणवत्ता सेवा प्रमाणपत्र ISO 9001-2018 जोडणे आवश्यक आहे	
१३	शासकीय संस्थेत लेबर सप्लायचे एकाच ठिकाणचे कमीत कमी ०५ लक्षापेक्षा जास्तीचे काम केल्याबाबत व मागील ३ महिन्याच्या ई.एस. आय.सी. व पी.एफ. च्या चलनाच्या प्रति जोडणे आवश्यक आहे.	

१४	ई–निविदा काराने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे व न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रूपये ५००/– बॉण्डपेपरवर सादर करणे आवश्यक आहे.	

टिप:– १. लिफाफा क्र. २ दरपत्रक ज्या एजन्सीची वरील कागदपत्रे पुर्ण असतील त्याच एजन्सीचे (कंत्राटदाराचे) दरपत्रक उघडले जाईल.

२. उपरोक्त सर्व नमुद कागदपत्रांच्या स्वप्रमाणित (Self Attested) छायाकींत प्रत या कार्यालयात कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळेस सादर करावे.

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

अटी व शर्ती

१. कंत्राटदार हे जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे माळी (बागकामगार) पुरवतील व त्यांच्या मदतीने परिशिष्ट–१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कामे करून घेतील.

२. ऑफलाईन निविदा सुचनेमध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार फॉर्म खरेदी / डाउनलोड / बिड भरणे / बिड समाविष्ट करणे / सेवा शुल्क जमा करणे / अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रक्रिया विहीत वेळेत पुर्ण करणे अत्यावश्यक आहे, याची निविदाकारांनी नोंद घ्यावी.

३. ऑफलाईन निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. (तांत्रिक व व्यापारी) निविदा प्रपत्र–१ मधील माहिती ही (BOQ Excel) मध्येच भरावी इतर कोठेही नमुद करण्यात येवु नये.

४. कंत्राटदारास तो उपलब्ध करून देत असलेल्या कंत्राटी सेवांसाठी शासन निर्णय पदनि/२५१२/प्र. क्र. १५७, का–१२, दिनांक २७/०२/२०१३, २६/०२/२०१३, ०६/०३/२०१३, १९/०३/२०१४, १६/०७/२०१४, २७/०१/२०१५, ०२/०८/२०१६ व २३/०२/२०१७ आणि शासन निर्णय कंत्राटी २०१६/प्र.क्र.१९४/का.१२ दिनांक २३/०२/२०१७ व ०९/०८/२०१७ या शासन निर्णयातील (सदर शासन निर्णय शासनाच्या https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत) निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

५. प्रपत्र–१ मधील स्तंभ क्र. ४ ते ९ मधील माहिती (BOQ) मध्ये कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

६. कंत्राटदारांनी नमुद केलेली वेतनाची रक्कम व अतिकालीक भत्त्याची रक्कम किमान वेतन कायद्यातील तदतूदीपेक्षा कमी नसावी.

७. कंत्राटीदाराने / संस्थेने / कंपनीने त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र / सेवा कराचे प्रमाणपत्र / मागिल तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र / पॅन कार्डची स्वाक्षांकित प्रत / एस.आय.सी. प्रमाणपत्राची स्वाक्षांकित छायाकींत प्रत / पी.एफ. प्रमाणपत्रांची स्वाक्षांकित छायाकींत प्रत / प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्राची स्वाक्षांकित छायाकींत प्रत इत्यादींच्या स्वाक्षाकींत छायाकींत प्रती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्रांच्या व कागदपत्रांच्या छायाकींत प्रती न जोडलयास त्यांचे निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

८. खाजगी कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात येणा–या कंत्राटी कर्मचा–यांची नांवे, त्यांचा पत्ता व त्यांच्या चारित्र्याविषयक प्रमाणपत्रे या कार्यालयात सादर करतील.

९. सदर कामाकरिता कंत्राटदार यांना देय मोबदला हा एक महिण्याचा कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल.

१०. कर्मचा–यांच्या कामाच्या वेळा कंत्राटदार हे कार्यालयाच्या गरजेनुसार ठरवतील कार्यालयात पुर्णवेळ कर्मचारी हजर राहतील, याची जबाबदारी ते घेतील.

११. सदरील कामकाजासाठी लागणा—या आवश्यक सर्व वस्तु / साधनसामुग्री याबाबतचा खर्च हा कंत्राटदार हे करतील.

१२. न्यायालयीन इमारतीमधील विद्युत दिवे हे गरजेप्रमाणे चालु व बंद करण्याबाबतची जबाबदारी कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचा—यावर राहील.

१३. कंत्राटदारास त्याने नेमलेल्या कंत्राटी कामगार यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते, बोनस व सवलती लागू करणे बंधनकारक असेल.

१४. ज्या निविदेमध्ये कंत्राटदाराने त्याच्या कामगारांना अदा करावयाची वेतनाची रक्कम, ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदाराकडुन कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + उपदान इत्यादी मिळुन होणारी रक्कम व कामगार कायद्यातील इतर तरतुदीनुसार देय रक्कम यापेक्षा कमी नमुद केली असल्यास, अशा कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात येणार नाही.

१५. कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधित कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्यांचे कंत्राट तात्काळ रद्द करून त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल. त्याअनुषंगाने कंत्राटदार यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी नेमणूक केलेल्या कर्मचा—यांच्या वेतनाबाबतची किंवा सेवेबाबत कोणत्याही तक्रारी या कार्यालयापर्यंत येणार नाहीत याची दखल घ्यावी. काम करतांना त्यांना कोणतीही इजा झाल्यास, त्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार राहील.

१६. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुषंगाने इतर सर्व भत्ते रोख स्वरूपात अदा न करता, संबंधीत कंत्राटी कामगारांच्या नावाने Account Payee Cross Cheque व्दारेच (रेखांकित धनादेशाव्दारे) अदा करावेत किंवा ई.सी.एस.व्दारे/एन.ई.एफ.टी.व्दारे त्यांचे बॅंक खात्यात जमा करावेत.

१७. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना दिलेल्या वेतनाच्या/इतर भत्यांच्या धनादेशाची (चेकची) छायांकित प्रत किंवा ई.सी.एस.व्दारे/एन.ई.एफ.टी. व्दारे वेतनाची रक्कम/इतर भत्यांची रक्कम कंत्राटी कर्मचा—यांच्या बॅंक खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बॅंक अधिका—यांचे सहीचे विवरणपत्र (Statement) आणि कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर कंत्राटी कामगाराचा धनादेश क्रमांक / ई.सी.एस.व्दारे / एन.ई.एफ.टी.चा यु.टि.आर. क्रमांक लिहिलेला असेल) कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयात सादर करावे. जो पर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाही तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदारास देयक अदा करण्यात येणार नाही.

१८. दुसरा व चौथा शनिवार आणि ज्या दिवशी कार्यालय बंद असेल अशा दिवशी कार्यालयीन कामासाठी कंत्राटी कामगारांना बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापून घेण्यात येवू नये. किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार, कंत्राटदाराने कंत्राटी कामगारास भरपगारी साप्ताहीक सुटटी देणे बंधनकारक आहे व ती सुट्टी कंत्राटी कामगारास रविवारी देण्यात यावी. त्यामुळे जर दुसरा व चौथा शनिवार या दिवशी कार्यालयीन कामासाठी कंत्राटी कामगारांना बोलविण्यात आले तर त्यास येणे बंधनकारक असेल व त्यांचा त्यांना वेगळा मोबदला मिळणार नाही.

१९. कंत्राटदाराचे महिन्याचे देयक अदा करतांना, त्या महिन्यात कंत्राटदाराने नेमलेले कामगार कार्यालयीन कामकाजाच्या जितके दिवस अनूपस्थित होते व त्यांच्या ऐवजी कंत्राटदाराने बदली कामगार उपलब्ध करून दिलेले नव्हते, तितक्या दिवसाचे वेतन कंत्राटदाराच्या देयकातून कापून घेण्यात येईल व महिन्यातील उर्वरित सर्व दिवसाचे देयक कंत्राटदारास अदा करण्यात येईल.

२०. शासकीय वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास, त्यांना अतिकालीक भत्ता (Over Time) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याचे सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर असेल.

२१. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचा—यांना कार्यालयात हजर होतांना व कार्यालय सोडतांना बायोमेट्रीक्स प्रणालीवर त्यांची उपस्थीती नोंदविणे बंधनकारक असेल, सदर नोंदणीसाठी होणारा संपूर्ण खर्च कंत्राटदाराने उचलावयाचा आहे. जेथे बायोमेट्रीक्स प्रणाली उपलब्ध नसेल तेथे स्वतंत्र हजेरीपटावर कार्यालयात कंत्राटी कामगारांची उपस्थिती व कार्यालय सोडल्याबाबतच्या नोंदी ठेवावयाच्या आहे.

२२. कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेंवेबद्दल ते किंवा त्यांचे वतीने नेमण्यात आलेले कंत्राटी कामगार यांना या कार्यालयाकडे कायमस्वरूपी नियुक्ती करीता हक्क मागण्याचे अधिकार राहणार नाहीत.

२३. कंत्राटदार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत, याची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याबाबतची दक्षता घेतील.

२४. कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा—यांकडून वक्तशीरपणे व नियमितपणे या कार्यालयातील काम करवून घेतील. त्यांची कार्यालयातील वर्तणूक व कामाची गूणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायीत्व हे या कार्यालयाच्या सर्व हितसंबंधाची रक्षा करणेच राहील.

२५. या कार्यालयाने वेळोवळी निर्गमित केलेले नियम व सूचना हे कंत्राटदार यांच्यावर बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणे विहित केलेल्या गूणवत्तेनुसार ते काम करून घेतील.

२६. कंत्राटदारासंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास हे कार्यालय नेमतील ते न्यायाधीश लवाद म्हणून काम पाहतील व १९९६ च्या लवादाच्या कायद्यानुसार या विवादाबाबत त्यांचा निर्णय अंतिम असेल.

२७. कंत्राटदाराकडून नेमलेल्या कंत्राटी कर्मचा—यांकडून सरकारी मालमत्तेचे नूकसान झाले असे कार्यालयास आढळून आल्यास कंत्राटदार यांना देय असलेल्या रकमेतून सदर रक्कम वसूल करण्यात येईल.

२८. कंत्राटदार यांना एकूण कंत्राटाच्या रकमेच्या १० टक्के बॅक गॅरंटी ही दोन वर्षाकरीता द्यावी लागेल. तसेच त्यांनी कराराच्या कोणत्याही अटी व शर्तिचा भंग केल्यास, बॅक गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा हक्क या कार्यालयास राहील. सेवाकराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास उर्वरीत करार नोटीस देवून रद्द करण्यात येईल आणि सदरचे काम इतर दूस—या एजन्सीकडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दूसरी व्यवस्था होईपर्यंत करून घेतले जाईल.

२९. कंत्राटदार यांनी अनामत रक्कम (Earnesh Money) रूपये २५,०००/— Offline D. D. व्दारे जमा करावी.

३०. ज्या कंत्राटदाराच्या ऑफलाईन निविदा स्विकारण्यात आलेल्या नाहीत तशा कंत्राटदारांनी दिलेली अनामत रक्कम, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी आदेश दिल्यानंतर परत करण्यात येईल. याची सर्व कंत्राटदारांनी अनामत रक्कम भरणेपूर्वी या बाबत दखल घ्यावी.

३१. सर्व ऑफलाईन निविदा या जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे दिलेल्या तारखेस व वेळेत

उघडण्यात येतील. परंतु जर काही अपरीहार्य कारणामुळे दिलेल्या तारखेस व वेळेत निवीदा उघडणे शक्य नसल्यास कार्यालयाच्या सोयीनुसार निवीदा उघडण्यात येतील.

३२. केवळ ऑफलाईन निविदा किंवा अनामत रक्कम जमा केली म्हणून कंत्राटदारास हक्क सांगता येणार नाही.

३३. कंत्राटदार यांनी कंत्राट दरम्यानच्या काळात वरील अटी व शर्तीचे पालन करीन असे हमीपत्र लिहून द्यावे लागेल.

३४. कंत्राटदारास स्वखर्चाने या कार्यालयाशी नोंदणीकृत करारनामा करार करावा लागेल व ते त्यांच्यावर बंधनकारक राहील.

दिनांक :— २०/०७/२०२६

जिल्हा न्यायाधीश—२,
जालना.

निविदा नमुना

निविदा मागविणा–या कार्यालयाचे नांव :– जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

कामाचे स्वरूप :– जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या न्यायालयासाठी बाहय यंत्रणेद्वारे (आउट सोर्सिंगद्वारे) माळी (बागकामगार) या पदाकरीता, दोन वर्षाकरीता कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देणे.

निविदा कमांक :– 01/2026

कंत्राटदाराचे/संस्थेचे/कंपनीचे नांव :–

कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपुर्ण पत्ता :–

कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा संपर्क दूरध्वनी :–

कंत्राटदारचा/संस्थेचा/कंपनीचा नोंदणी कमांक:–

कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा सेवा कर क. :–

कंत्राटदाराच्या संस्थेचा/कंपनीचा जी.एस.टी. नोंदणी क्रमांक:–

प्रपत्र–1

अ. क.	कामाचे स्वरूप	मागणी करण्यांत आलेली कर्मचारी संख्या	मागणी केलेल्या पदासाठी कंत्राटी सेवा पुरवण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकुण रक्कम (दोन वर्षाकरीता खर्च)	साधन सामुग्री खर्च (रूपये) (दोन वर्षाकरीता खर्च)	विमा 2% (दोन वर्षाकरीता खर्च)	वस्तु व सेवा कर (दोन वर्षाकरीता खर्च)	एकुण रक्कम (रूपये) (स्तंभ 4+5+6 +7)	एकुण रक्कम (रूपये) अक्षरी
1	2	3	4	5	6	7	8	9
1	माळी (बागकामगार)	1						

निविदेची एकुण रक्कम रूपये /– (अक्षरी रूपये ——————————————)

दिनांक :– / /२०२६ ई–निविदाकाराचे नाव सही

(कंत्राटदाराचे नाव,सही,शिक्का,दिनांक)

(अ.क्र.४ ते ९ हया स्तंभातील माहिती कंत्राटदाराने भरावयाची आहे.)